आरोग्य कार्यालय
अन्न परवाना विभाग
पुणे महानगरपालिका
जा.क्र. एचएलओ/ 9253
दिनांक:१६/०१/२०२४

---

प्रति,
मा. अधिक्षक,
राज्य कामगार विमा महामंडळ रुग्णालय,
बिबवेवाडी,
पुणे-४११०३७

यांजकडेस सादर

विषय :- नोंदणी प्रमाणपत्र गरजेचे नसलेबाबत प्रमाणपत्र मिळणेबाबत

संदर्भ:- राज्य कामगार विमा महामंडळ रुग्णालय, बिबवेवाडी पुणे कार्यालयाकडील जा.क्र.U-33/2/2024-ESISHospBibvewdi/ Admin Dt.12/01/2024 चे पत्र इकडील आवक क्र. एचएल/२६७४ दि.१५/०१/२०२४ चे पत्र

महोदय,

उपरोक्त विषयांकित व संदर्भांकित पत्रान्वये राज्य कामगार विमा महामंडळ रुग्णालय, बिबवेवाडी पुणे हे शासकीय रुग्णालय असल्याने त्यासाठी विशिष्ट नोंदणी क्रमांकाची आवश्यक्ता नसलेबाबत आपले कार्यालयाकडुन प्रमाणपत्र निर्गमित व्हावे असे कळविले आहे.

महाराष्ट्र शुश्रुषालय नोंदणी नियम अधिनियम १९४९ मधील कलम १८ (१) मध्ये कोणतेही शुश्रुषालय शासनाने अथवा स्थानिक प्राधिकरण किंवा राज्यशासनाने यासाठी मंजुर केलेल्या व्यक्तीच्या समुहाने चालविले जात असेल अशा शुश्रुषालयांना हा अधिनियम लागु होणार नाही असे नमुद आहे.

राज्य कामगार विमा महामंडळ रुग्णालय, बिबवेवाडी पुणे हे शासकीय रुग्णालय असल्याने सदर रुग्णालयास सदर अधिनियमान्वये नोंदणीची आवश्यक्ता नसल्याचे दिसुन येत आहे. तरी सदरची बाब आपले माहितीस्तव सादर करीत आहोत.

कळावे,

15/1/2024
(डॉ. मनिषा विनोद नाईक)
सहाय्यक आरोग्य अधिकारी(प)
पुणे महानगरपालिका

15/1/24
(डॉ. भगवान पवार)
आरोग्य अधिकारी
पुणे महानगरपालिका